मराठी विज्ञान परिषद पत्रिका

# विज्ञान नमन

ॐ नमो विज्ञानेश्वरा । ईश्वरेश्वरा । जोडितो करा ।
शक्ति, बुद्धि आणि युक्तिचा वाहू दे झरा, हे मोरेश्वरा ॥ धृ ॥
मग नमन ज्ञानसूर्याला । आद्य ऊर्जेला । तेजोगोलाला ।
विचारांच्या अणुस्फोटाची ऊर्जा द्या जरा, हे ज्ञानेश्वरा ॥
वंदितो प्रश्नचिन्हाला । ज्ञानवन्हिला । जिज्ञासे तूला ।
सृष्टिचे उकलण्या गूढ, लावी हातभारा, चावी ही घरा ॥
तर्कदेवा तुलाही मुजरा । शोधाचा चेहेरा । बदलवी मोहोरा ।
तर्कनिष्ठ स्पष्ट प्रमाणाच्या देई आधारा, हे तर्केश्वरा ॥
वैज्ञानिका तूझा पोवाडा । कीर्ति चौघडा । वाजे धडधडा ।
शास्त्रीय श्रद्धेची धुरा, वाहण्या त्वरा, करावी चतुरा ॥
विज्ञान डफाची थाप । धुमवु जगतात । तिन्ही लोकात ।
विज्ञान विश्वकल्याणा, हाच एक नारा, धुमु दे नरा ॥
विज्ञानशाहीर दंग कवनात । विज्ञानभक्तित । प्रभाकर त्यात ।
विज्ञानधर्म आचरा, व्यापी चराचरा, तयार शाहीरा ॥

ले. : **विज्ञान शाहीर प्रभाकर,**
6–9–78
गणेश चतुर्थी
मुंबई 51